## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०७ ची साक्ष

## निशाणी क्र.६०

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – रतीलाल भिमराव निकुंभे,

वय – ५१ वर्षे,

व्यवसाय – ग्रामविकास अधिकारी,

राहणार – एम.के. नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार

### सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. अे. डी. कुलकर्णी यांचे मार्फत.

१. सन २०१३ ते २०१४ या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये मी मालपुर ग्रामपंचायत येथे ग्रामविकास अधिकारी म्हणुन काम पाहिलेले आहे. मी राजश्री लक्ष्मण पानपाटील यांना ओळखतो. त्या सन २०१३ ते २०१८ या कालावधी दरम्यान मालपुर गावच्या सरपंच होत्या. मी त्यांचे पती लक्ष्मण पानपाटील यांना ओळखतो. मी संतोष इंदवे यांस ओळखतो. मी जयंत सरदार यांस ओळखत नाही. संतोष इंदवे हे गावातील पत्रकार असल्याने मी त्यांना ओळखतो.

२. मी व सरपंच ग्रामपंचायतीमध्ये काम करीत होतो. त्यावेळेस तेथे संतोष इंदवे हा आला. त्याने आमच्या कामकाजाबाबत पेपरमध्ये आमच्याविरुध्द बदनामी केली होती. संतोष इंदवे याने सरपंच मॅडम यांना 'तुम्हांला जर हे प्रकरण थांबवायचे असेल तर ५० हजार रुपये दया' असे म्हटले. तसेच पुढे त्याने सरपंच मॅडम यांना 'तुम्ही जर पैसे नाही दिलेत तर मी आजुन छापील व आजुन बदनामी करीन' अशी धमकी दिली. त्यानंतर संतोष इंदवे तेथुन निघुन गेला. त्यानंतर सरपंच मॅडम यांनी त्याचे विरुध्द गुन्हा दाखल केला.

३. त्यानंतर संतोष इंदवे याने त्याच्या रिस्क टुडे या पेपरमध्ये बातमी छापली व तो पेपर पुर्ण परीसरात वितरीत केला. त्यामुळे सरपंच मॅडम यांची बदनामी झाली. त्यांची गावामध्ये प्रतिष्ठा होती, ती मलीन झाली. त्यामुळे सरपंच मॅडम यांनी संतोष इंदवे व रिस्क टुडे या पेपरचे मुख्य संपादक जयंत सरदार यांचे विरुध्द गुन्हा दाखल केला. पोलीसांनी सदर प्रकरणामध्ये

माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. मी संतोष इंदवे याला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात पाठीमागे बसलेला आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचीत यांचे मार्फत.</u>**

४. मी मालपुर येथे २०१३ व २०१४ चे दरम्यान नेमके कोणत्या तारखेपासुन कोणत्या तारखेपर्यत ग्रामविकास अधिकारी म्हणुन काम पाहत होतो हे मला आता सांगता येणार नाही. मी आणि सरपंच मॅडम ग्रामपंचायतीमध्ये काम करीत असतांना ज्या दिवशी संतोष इंदवे तेथे आला त्याची तारीख मी कोठेही लिहुन ठेवलेली नाही. ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत संतोष इंदवे याने खंडणी मागीतली व बदनामी केली याबाबत मी माझ्या रोजनिशीमध्ये लिहुन ठेवलेले नाही. मी सदर प्रकाराबाबत माझे वरीष्ठ असलेल्या गटविकास अधिकारी अथवा मुख्याधिकारी, जिल्हा परीषद यांना लेखी कळविले नव्हते. माझ्या समक्ष ग्राम पंचायतीच्या कार्यालयामध्ये मागीतल्या गेलेल्या खंडणीबाबत अथवा सरपंचांच्या बदनामी बाबत मी कधीही पोलीसांकडे तक्रार दिलेली नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, संतोष इंदवे याने रिस्क टुडे या पेपरच्या प्रती वितरीत केल्या ही माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण गंभीर पानपाटील हे आजरोजी माझ्यासोबत न्यायालयामध्ये आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात आल्यापासुन लक्ष्मण गंभीर पानपाटील हे सतत माझ्या सोबत होते. मला लक्ष्मण पानपाटील हे आजरोजी भेटलेले होते. माझे व लक्ष्मण पानपाटील यांचे बोलणे झाले नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३-२०१४ चे दरम्यान मी मालपुर येथे ग्रामविकास अधिकारी म्हणुन काम पाहत असतांना माझ्या विरुध्द रमाई आवास योजना या योजनेचा लाभ अपात्र असलेल्या लोकांना दिल्याची तक्रार होती. हे म्हणणे खरे नाही की, तसेच अन्य शासकीय योजनांचा लाभ मी शासकीय सेवेत असलेल्या लोकांना दिल्याची माझ्याविरुध्द तक्रार होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व सरपंच यांनी मालपुर ग्रामपंचायतीमध्ये अनियमीत काम

केल्याची देखील आमच्या विरुध्द तक्रार आहे. हे म्हणणे खरे नाही की, हया तक्रारी संतोष करतो असे मला लक्ष्मण याने सांगीतले.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान कथन केल्याप्रमाणे कोणताही प्रसंग न घडल्याने मी त्याची तारीख कोठेही नमुद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व सरपंच अनियमीत काम करीत असलेबाबत संतोष तक्रार करतो म्हणुन त्याचे विरुध्द आम्ही मी सरतपासात कथन केल्याप्रमाणेचा खोटा प्रसंग तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणताही प्रसंग कधीही न घडल्यामुळे मी वरीष्ठांकडे त्याबाबत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व सरपंच ग्रामपंचायतीमध्ये काम करीत बसलो होतो, त्यावेळेस संतोष इंदवे तेथे आला, त्याने आमचे विरुध्द बदनामीकारक बातमी छापली होती, त्याने आमचेकडे पन्नास हजार रुपयांची खंडणी मागीतली, ते दिले नाही तर आणखी छापेन व आणखी बदनामी करेल अशी धमकी दिली आणि त्याच्यानंतर त्याने रिस्क टुडे हा पेपर पुर्ण परीसरात वितरीत केला व त्यामध्ये सरपंच मॅडम यांची बदनामी केली, तसेच त्यांची असलेली प्रतिष्ठा गावामध्ये मलीन झाली असा कोणताही प्रसंग घडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी, सरपंच व लक्ष्मण गंभीर पानपाटील यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत अनियमीतता केली होती, अनेक अपात्र लोकांना योजनांचा लाभ दिला होता व त्यामुळे त्याबाबत तक्रार झाली होती आणि सदर तक्रारींना शह देण्याकरीता व सरपंच यांनी संगनमताने खोटा प्रसंग उभा करुन आरोपींविरुध्द ही खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष इंदवे हा पत्रकार असल्याने मी त्याला ओळखतो हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष इंदवे व रिस्क टुडे या पेपरचे संपादक जयंत सरदार यांचेविरुध्द सरपंचांनी तक्रार दिली हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी लक्ष्मण गंभीर पानपाटील याचे सांगण्यावरुन आजरोजी न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयासमोर काय सांगायचे हे मला लक्ष्मण पानपाटील याने सांगीतले व त्याप्रमाणे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संतोष इंदवे व जयंत सरदार यांचा रिस्क टुडे या पेपरशी काहीएक संबध नाही. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण पानपाटील व माझी राजश्री पानपाटील या सरपंच असतांना मैत्री जुळली होती व त्यामुळे त्यांना मदत करण्याकरीता मी आजरोजी साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : ०६/०१/२०२४ (आदित्य घ. नाईक)

स्थळ : दोंडाईचा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - ०८.०१.२०२४ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक.